आरोग्य उपकेंद्रातील अंशकालीन स्त्री परिचरांच्या मासिक मानधनात वाढ करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## शासन निर्णय क्रमांकः बैठक-२०२२/प्र.क्र.११५/सेवा-२ (ई-७२५९७६)

गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार संकुल
नवीन मंत्रालय, मुंबई.
दिनांक: १७ मार्च, २०२६

वाचा :-

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.०६/सेवा-९, दि.०१.०३.२०१९
२) मा. मंत्रीमंडळ सचिव यांचे दि.०५.०३.२०२६ रोजीचे पृष्ठांकन ( मा. मंत्रीमंडळ बैठक दि.२६.०२.२०२६, विषय क्र.१४ कार्यवृत्त)

प्रस्तावना :-

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त प्राथमिक स्वरुपाच्या आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आरोग्य उपकेंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. आरोग्य उपकेंद्रामध्ये खोल्यांची स्वच्छता करणे, आरोग्य सेविकेसमवेत गृहभेटी देणे, तसेच रात्री-अपरात्री परिचारीकेसोबत आवश्यकतेनुसार भेटी देणे, गरोदर माता शोधून काढून त्यांना लोहयुक्त गोळ्यांचे वाटप करणे, गरोदरपणातील तपासणी शिबीर आयोजीत करण्यास मदत करणे, तसेच प्रसुतिपश्चात गृहभेटी देऊन आरोग्य सेवा पुरविण्यास मदत करणे, प्राथमिक आरोग्य केंद्रात शस्त्रक्रिया शिबीर आयोजीत केल्यानंतर तेथे उपस्थित राहणे, लसीकरण सत्रासाठी घरोघरी जाऊन माहिती देणे, सदर लसीकरण सत्रास मदत करणे व लसीकरण गृहाची स्वच्छता करणे, कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेसाठी महिलांना प्रवृत्त करणे, त्यांना आरोग्य केंद्रात घेऊन जाणे, गर्भनिरोधक गोळ्या वाटपासाठी मदत करणे, साथरोग नियंत्रणाबाबत घरोघरी जाऊन माहिती देणे, विविध आजाराचे रुग्ण आढळल्यास त्याची माहिती आरोग्य सेविकेस देणे इ. स्वरुपाची कामे करण्यासाठी अंशकालीन स्त्री परिचरांची नियुक्ती जिल्हा परिषदांमार्फत करण्यात येते. अंशकालीन स्त्री परिचरांना त्यांच्या सेवेकरिता मासिक मानधन अदा करण्यासाठी या विभागामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. सद्यस्थितीत अंशकालीन स्त्री परिचरांना वित्त विभाग, शासन निर्णय, दि ०१.०३.२०१९.अन्वये निश्चित केल्यानुसार दरमहा रु. ३०००/- इतके मानधन अदा करण्यात येते.

अंशकालीन स्त्री परिचरांच्या कामाचे स्वरुप पाहता ग्राम पातळीवर तळागाळापर्यंत, आदिवासी भागात, दुर्गम व डोंगराळ भागात प्राथमिक स्वरुपाच्या आरोग्य सेवा पोहचविण्याचे कार्य त्यांच्यामार्फत करण्यात येते. विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्यविषयक कार्यक्रमांचा लाभ प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहचविण्यात अंशकालीन स्त्री परिचर महत्वाची भूमिका बजावतात. तथापि, उपरोक्त कामांसाठी त्यांना इतर कोणताही वेगळा भत्ता देण्यात येत नाही. त्यांच्या कामाचे स्वरुप पाहता त्यांच्या मानधनात वाढ करण्यासाठी अनेक संघटना व लोकप्रतिनिधींकडूनही सातत्याने शासनास मागण्या प्राप्त होत होत्या. त्यानुषंगाने अंशकालीन स्त्री परिचरांच्या कामाचे बदलते स्वरूप, आरोग्य सेवेतील वाढती भूमिका आणि दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या महागाईचा विचार करता अंशकालीन स्त्री परिचरांच्या मासिक मानधनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. अंशकालीन स्त्री परिचरांच्या मानधन वाढीबाबतच्या प्रस्तावास मा. मंत्रीमंडळाने दि.२६ फेब्रुवारी,२०२६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली असून त्यानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमीत करण्यात येत आहे.

## शासन निर्णय:-

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त राज्यातील आरोग्य उपकेंद्रांमध्ये कार्यरत असलेल्या अंशकालीन स्त्री परिचरांच्या मासिक मानधनात **दि.०१ एप्रिल,२०२६** पासून खालीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | पदनाम | सध्याचे मानधन | प्रस्तावित वाढ | एकूण मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | अंशकालीन स्त्री परिचर | ३०००/- | ३०००/- | ६०००/- |

२. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त राज्यातील आरोग्य उपकेंद्रांमध्ये कार्यरत असलेल्या अंशकालीन स्त्री परिचरांच्या सुधारीत मानधनापोटी शासनावर प्रतिवर्षी पडणाऱ्या अंदाजित रु.३९,१८,६०,०००/- (अक्षरी रुपये एकोणचाळीस कोटी अठरा लक्ष साठ हजार फक्त) इतक्या अतिरिक्त खर्चास पुढील अटी शर्तींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

i. सदर खर्च हा (०२)(०८) प्राथमिक आरोग्य केंद्रे अंतर्गत २२१० ५०४१ (स्थानिक क्षेत्रे) (अनिवार्य) ३६-सहायक अनुदाने या उद्दिष्टाखालील उपलब्ध तरतूदीमधून भागविण्यात यावा.

ii. सर्व जिल्हा परिषदांनी अंशकालीन स्त्री परिचरांना प्रचलित कार्यपध्दतीनुसार सुधारीत मासिक मानधन अदा करण्याची कार्यवाही करावी.

iii. सर्व जिल्हा परिषदांनी अंशकालीन स्त्री परिचरांना दरमहा दहा तारखेपर्यंत मासिक मानधनाची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करावी.

iv. सदर खर्च विहित पध्दतीने व विहीत प्रयोजनासाठीच करणे बंधनकारक राहील.

३. सदर शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या दि.२६.०२.२०२६ रोजीच्या बैठकीतील मान्यतेनुसार दि.०५.०३.२०२६ अन्वये प्राप्त इतिवृत्ताच्या अनुषंगाने निर्गमीत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३१७१७५७४३३६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHANDRAKANT ARUN VIBHUTE

Digitally signed by CHANDRAKANT ARUN VIBHUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=D772C1C0413F707CB062D972B2618CF3943831624F050BADD4BD9AEA24219790, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B37242131913CE4AD7FFA0CAA314C8163271F8AF6410B5DFF1FC5B4C3CC19B76, cn=CHANDRAKANT ARUN VIBHUTE
Date: 2026.03.17 19:49:37 +05'30'

(चंद्रकांत विभूते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव
४) मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
५) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता
७) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
८) सर्व मंत्रालयीन विभाग
९) आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
१०) संचालक, आरोग्य सेवा, पुणे/मुंबई
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा

१२) महालेखापाल-१/२(लेखा परीक्षा) (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१३) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५) सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, मुंबई
१६) सहसंचालक (हि.ह.व ज.), आरोग्य सेवा, पुणे
१७) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व मंडळे)
१८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी
१९) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२१) अवर सचिव/कक्ष अधिकारी (सर्व), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२) निवडनस्ती (सेवा-२),सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई.